## प्रकरण तिसरे

# "नगरपालिकेमध्ये निवडून आलेल्या स्त्रियांची व्यक्तिगत माहिती"

# प्रकरण तिसरे

## "नगरपालिकेमध्ये निवडून आलेल्या स्त्रियांची व्यक्तिगत माहिती"

दुस-या प्रकरणामध्ये आपण मुरगूड नगरपालिकेची ऐतिहासिक पार्श्वभूमि पाहिली आहे. त्यामध्ये आपणास असे आढळून येते की, नगरपालिका स्थापन झाल्यापासून सन १९५१ पर्यंतच्या काळात नगरपालिकेमध्ये स्त्रियांना प्रतिनिधीत्व दिले जात नव्हते. परंतु सन १९५२ पासून शासकीय कायद्यानुसार नगरपालिकेमध्ये एक जागा स्त्रियांसाठी राखीव करण्यात आली होती. परंतु स्त्रीला प्रतिनिधीत्व मिळूनसुध्दा पुरुष प्रधानतेमुळे व सर्व कामकाजाचे अधिकार पुरुष सदस्यांकडेच असल्यामुळे त्याचा फारसा उपयोग होऊ शकला नाही. तेथून पुढे सन १९६६ मध्ये स्त्रियांच्या या जागांमध्ये वाढ करुन त्यांची नगरपालिकेत सदस्य संख्या दोन करण्यात आली होती.[१] परंतु त्यांना प्रतिनिधीत्व मिळून सुध्दा त्या आपला कारभार व्यवस्थित पाहू शकल्या नाहीत. कारण त्यांना पुरुषप्रधान संस्कृतीमुळे नगरपालिकेमध्ये सभेला येणेही अवघड गोष्ट होती. तसेच त्यावेळी एखादी स्त्री सदस्य गैर राहिल्यास दुस-या स्त्री सदस्याच्या मनात सभेला जावे असे मनात असूनही तिच्या जोडीला दुसरी स्त्री प्रतिनिधी नसल्यामुळे जावू शकत नव्हती. त्याच बरोबर त्यांच्या १९६६ ते सन १९९० पर्यंतच्या कार्याचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, सन १९९० पर्यंत त्यांना महिला व बालकल्याण समिती, पाणी पुरवठा समिती या पारंपरिक म्हणजेच स्त्रियांच्या संबंधातील समित्यांमध्ये सदस्यत्व दिल्याने त्या पारंपरिकच काम करीत राहिल्या होत्या. मात्र हे काम करत असताना त्यांच्या कार्यात त्यांच्या कुटुंब सदस्याचा हस्तक्षेप होत होता. वरील समित्याशिवाय त्यांना इतर महत्त्वाच्या समितीवर काम करण्यास संधी दिली गेली नाही. याचे कारण म्हणजे "स्त्री"ला समाजामध्ये कमी स्थान दिले गेले होते.

दरम्यानच्या काळात सन १९७१ ते ७४ मध्ये केंद्रिय शासनाने स्त्रिला कोणत्या घटकांमुळे समाजात स्थान मिळत नाही याची कारणे शोधण्यासाठी "भारतीय समाजात स्त्रीचे स्थान" या नावाची समिती नेमली. [२] परंतु या विषयाचा अभ्यास होऊनसुध्दा त्यातून स्त्रीच्या सामाजिक स्थानाबद्दल कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात आली नाही. याचा परिणाम म्हणून भारतात पूर्वीपेक्षा ७० ते ८० टक्के पेक्षा जास्त प्रमाणात स्त्री चळवळींचा वेग वाढला. त्यामुळे केंद्रिय सरकारला महिलांच्या धोरणात बदल करुन सन १९९० मध्ये महिलांच्यासाठी राजकारणात ३० टक्के राखीव जागा ठेवाव्या लागल्या.

त्यानुसार शासनाने सन १९९० मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना ३० टक्के राखीव जागा ठेवण्यासंदर्भातील कायदा मंजूर केला. [3]

या कायद्याच्या आधारे सन १९९० मध्ये मुरगूड नगरपालिकेची निवडणूक झाली होती. त्यावेळी मुरगूड नगरपालिकेमध्ये एकूण २५ प्रभाग निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी ३० टक्के म्हणजेच ८ प्रभागावर स्त्री राखीव जागा निश्चित करण्यात आल्या होत्या. या ८ जागा पैकी एक जागा मागासवर्गीय स्त्री राखीव करण्यात आली होती. यानुसार झालेल्या दि. २४.११.१९९ च्या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या खालील स्त्री प्रतिनिधी कशाच्या आधारे कार्य करत होत्या हे आपण पाहू. [४]

| अ.क्र. | स्त्री प्रतिनिधींचे नांव | प्रभाग क्र. | जागा |
|---|---|---|---|
| १) | सौ. वंदना रघुनाथ चौगुले | १ | सर्वसाधारण स्त्री राखीव |
| २) | सौ. सरस्वती गजानन भाट | ५ | -"- |
| ३) | सौ. उमादेवी रघुनाथ सुर्यवंशी | ९ | -"- |
| ४) | सौ. गौराबाई बजरंग सोनुले | ११ | मागासवर्गीय स्त्री राखीव |
| ५) | सौ. सोनाबाई विष्णूपंत जाधव | १२ | सर्वसाधारण स्त्री राखीव |
| ६) | सौ. आनंदी रामचंद्र भारमल | १८ | -"- |
| ७) | सौ. सुनंदा नामदेव मेंडके | २२ | -"- |
| ८) | सौ. शकुंतला बाजीराव गोधडे | २४ | -"- |

१) सौ. वंदना रघुनाथ चौगुले - प्रभाग क्र. १
वय - ३० वर्षे, शिक्षण ९वी पास.

## आर्थिक परिस्थिती :

वडील शेतीवाडी करत असलेने परिस्थिती चांगली आहे. तसेच पती औद्योगिक क्षेत्रात काम करत असलेने व शेती करत असलेने कुटुंबाची चांगली आर्थिक परिस्थिती आहे.

## सामाजिक परिस्थिती :

पती समाजातील विविध कार्यक्रमात सहभागी तसेच सांस्कृतिक व राष्ट्रीय सणात हिरीरीने भाग घेत असतात. लोकांची विचारपूस करणे, आर्थिक अडचणी सोडवणे असे काम ते करत असतात.

## राजकीय परिस्थिती :

वडील सरपंच व सेवा संस्थेचे चेअरमन होते. तसेच पती व सर्व कुटुंब राजकीय वातावरणात असल्याने राजकारणात उतरण्याची संधी मिळाली. परंतु राजकारणात फारसा रस नाही. नगरपालिकेच्या स्त्री राखीव जागेसाठी कुटुंबातील सर्व लोकांनी उमेदवारी भरणेसाठी प्रोत्साहीत केले.

शिक्षण ९वी पर्यंत झाले असलेने फारशी राजकीय माहिती नव्हती. तसेच पतीच्या सांगण्याप्रमाणे कामकाज चालवणे अशी रित होती. पहिल्या वर्षी महिला व बालकल्याण समितीवर सदस्या म्हणून नियुक्ती झाली. या समितीत काम करत असताना प्रामुख्याने स्त्रियांसाठी लागणा-या सोयी तसेच बालकांसाठी बालवाडी चालवणे अशा उपाय योजना केल्या होत्या.

दुस-या वर्षी त्या बांधकाम समितीच्या सदस्या होत्या. त्यात त्यांनी गावातील तलावाची स्वच्छता राखणेविषयी, त्याला कठडा बांधून घेण्याबाबत मागणी केली. तसेच बालसंगोपन व सुधारगृहे व्हावीत यासाठी प्रयत्न केले.

नगरपालिकेच्या जनरल सभाना सतत हजर असतात.

आपल्या प्रभागासाठी पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी तसेच सांडपाणी जाणेसाठी गटार दुरुस्ती करणे, पक्के रस्ते करणे, प्रभागाची स्वच्छता राहण्यासाठी कोंडावळे ठेवणे, भंगी पॅसेजची स्वच्छता राखण्याविषयी विशेष प्रयत्न केले गेले.

12646
A

लहान मुलांच्या बुध्दीला चालना मिळावी यासाठी विविध बौध्दिक स्पर्धा भरवणे तसेच त्यांची शारीरिक तंदरूस्ती रहावी यासाठी सुदृढबालक स्पर्धा प्रतिवर्षी भरवण्यासाठी यांनी खास प्रयत्न केले आहेत.

गरीब व मागासवर्गीयातील होतकरू व अभ्यासू मुलांना कपडे वाटप करणे याकडेही त्या सतत लक्ष देत असतात.

त्यांचा प्रशासकीय कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यावर जोर असे. त्यांच्या मते आतापर्यंत ठरवलेली सर्व कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, प्रभाग १ मधील स्त्री प्रतिनिधी निवडून येण्यासाठी आर्थिक घटकाचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. तसेच घरातील वातावरण सामाजिक व राजकीय असल्याने या घटकांचा देखील त्यांच्या उमेदवारीवर व निवडून येण्यावर प्रभाव जाणवतो. नंतरच्या काळात त्यांना राजकीय कार्यात रूची वाटत होती हे त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीवरून दिसून येते. निवडून आलेल्या पहिल्या वर्षी मात्र राजकीय कार्याची माहिती नसल्याने थोडयाफार प्रमाणात पतीच्या विचाराचा आधार घ्यावा लागला होता असे दिसते.

२) सौ. सरस्वती गजानन भाट - प्रभाग क्र. ५

वय - ४८ वर्षे, शिक्षण - ७वी पास.

आर्थिक परिस्थिती :

वडीलांच्याकडील आर्थिक परिस्थिती बेताची होती. वडील शेती-वाडी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. पतीकडील आर्थिक परिस्थिती ब-यापैकी आहे. पती व्यापारी असलेने व मुले उद्योगी असलेने आर्थिक सुबता तयार झाली.

सामाजिक परिस्थिती :

त्यांचे सर्व कुटुंबच समाजात मनमिळावूपणे वागत असते. त्यापैकी सौ.सरस्वतीबाई अगदीच मनमिळावू व दुस-याविषयी आदर राखणा-या अशा आहेत. शेजा-यांची विचारपूस व त्यांच्या सुख-दु:खात सतत सहभागी होत असतात. त्यामुळेच त्या आपल्या प्रभागात लोकप्रिय आहेत.

राजकीय परिस्थिती :

हे कुटुंबच राजकीय वातावरणात वाढलेले आहे. त्यांचे पती राजकीय गोष्टीत सहभागी असतात. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर ते बिंबले आहे. त्यामुळे पतीच्या प्रेरणेने त्या राजकारणात उतरल्या. विधानसभा व नगरपालिकेच्या निवडणूकीवेळी प्रचार करणे, हळदी-कुंकु कार्यक्रम घेणे, आपली भूमिका लोकांना पटवून देणे या बाबतीत त्या सतत पुढाकार घेत असतात.

या सर्व पार्श्वभूमीमुळे त्या राजकारणात उतरल्या व पतीच्या आणि कुटुंब सदस्यांच्या प्रेरणेने त्यांना चालना मिळाली. नगरपालिकेच्या प्रभाग क्र.५ मधून त्या नगरसेविका म्हणून निवडून आल्या. निवडून आल्यानंतर त्या आतापर्यंतच्या बहुतेक सर्वसाधारण सभांना हजर असतात. त्यांचे शिक्षण ७वी पर्यंत झाले असलेने महिलांना शिक्षणाची आवड असल्याशिवाय व कुटुंबाची साथ असल्याशिवाय त्यांना शिकता येत नाही, असे त्यांचे मत आहे. नगरपालिकेकडून स्त्री वर्गासाठी खास सोयी उपलब्ध करून व सवलती दिल्या जावून शिक्षणाची दिशा दाखवली पाहिजे याविषयी त्या प्रयत्नशील आहेत.

स्त्रियांसाठी खास सौचालयाची व्यवस्था व्हावी यासाठी सतत नगरपालिकेत आवाज उठवत असतात. ब-याच काळापर्यंत या प्रभागाकडे नगरपालिकेची दुर्लक्ष झालेने भंगी पॅसेज व रस्ते नादुरुस्त झाले होते. त्यापैकी भंगी पॅसेजची दुरुस्ती करून घेण्यापाठीमागे यांचे कार्य चांगले आहे.

या स्वत:च्या मतानुसार कारभार करत असूनसुध्दा कांहीवेळा पती सांगतील त्याप्रमाणे कारभार हाताळावा लागतो. प्रभागातील सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी गटारी बांधण्यात यांचा पुढाकार आहे. रस्त्यांचे डांबरीकरणे, प्रभागात लाईटची सोय, सार्वजनिक संडास बांधणे व स्वच्छता याविषयी त्या सर्वसाधारण सभेच्यावेळी अडचणी मांडत असतात.

जकात समिती सदस्या म्हणून तसेच महिला व बालकल्याण कमिटी सदस्या म्हणून यापूर्वी त्या काम करत होत्या. सध्या त्या महिला व बालकल्याण समितीच्या चेअरमन आहेत.

या समितीमार्फत स्त्री प्रसूतीसाठी सरकारी दवाखान्यात योग्य सोयी उपलब्ध व्हाव्यात, तसेच मुलांच्या औषधोपचारासाठी नगरपालिके-कडून मोफत सोय व्हावी, महिलांची व मुलांची आरोग्य शिबीरे भरवावीत असा त्यांचा मानस आहे.

वरील सर्व गोष्टी लक्षात घेता आपणास असे दिसून येते की, प्रभाग क्रमांक ५ मधील स्त्री प्रतिनिधीच्या कार्यावर कुटुंबाच्या राजकीय व सामाजिक घटकांचा प्रभाव पडलेला होता. त्यामुळेच त्यांना नगरपालिकेत स्त्री प्रतिनिधी म्हणून काम करण्यास संधी मिळाली.

३) सौ. उमादेवी रघुनाथ सुर्यवंशी - प्रभाग क्र. ९

वय - ४५ वर्षे, शिक्षण ९ वी.

<u>आर्थिक परिस्थिती :</u>

वडिलांची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली आहे. वडील व्यापारी तर भाऊसुध्दा व्यापारी असलेने परिस्थिती चांगली आहे. तसेच पतींचा व्यवसाय सहकारी साखर कारखान्यात नोकरी करणे व शेती करणे असा असलेने पतीकडील आर्थिक परिस्थिती सुध्दा चांगल्या प्रकारची आहे.

<u>सामाजिक परिस्थिती :</u>

पती सामाजिक कार्यात सतत पुढे असत. समाजातील धार्मिक विधी, लग्न समारंभ यामध्ये ते पुढे होऊन भाग घेत असत. त्यांच्या बरोबर उमादेवी असल्याने पतीच्यामुळे त्या समाजकार्यात आल्या आहेत.

राजकीय परिस्थिती :

पती एका स्थानिक राजकीय गटाचे प्रमुख समर्थक असल्याने व त्यांच्या प्रोत्साहनामुळे यांना प्रभाग क्र.९ मधून स्त्री उमेदवार म्हणून निवड करण्यात आली आहे. व पतींच्या सांगण्यावरूनच राजकारणात सहभागी झाल्या. परंतु वडीलांच्याकडील काळात मतदान करण्यापलीकडे राजकारणात सहभाग नव्हता.

यांचे ९वी पर्यंत शिक्षण झाले असलेने थोडीसी स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी जाणीव होती. तसेच पतीचे समाजकार्य बघून व घरचे वातावरण बघून समाजकार्य करण्याची प्रबळ इच्छा झाली. त्या पतीच्या प्रेरणेने स्थानिक पतसंस्थेत संचालिका म्हणून काम पहात होत्या. त्यातून लोकांच्या आर्थिक अडीअडचणी काय असतात त्या कशा सोडवल्या पाहिजेत याची माहिती मिळाली व त्यातून राजकीय वातावरण बनू लागले. नगरपालिकेच्या निवडणूकीत विजयी झालेनंतर राजकारणाला गती मिळाली.

या काळात दोन वर्षे नगरपालिकेच्या शिक्षण समितीवर काम करण्याची संधी मिळाली. यात स्त्री शिक्षण व स्त्री समस्यांवर समाजात जाणीव निर्माण करण्यासाठी "स्त्री समस्या सोडवणूक" यावर भर दिला. तसेच मुलांसाठी मोफत बालवाडी वर्ग स्थापन करणे, नगरपालिकेतर्फे त्यांना प्रोत्साहन म्हणून खाऊ वाटप करणे यासारखे उपक्रम हाती घेतले गेले. महिला व बालकल्याण समिती सदस्य असल्याने त्यांना अशा प्रकारच्या उपाययोजनांची दखल घेतली. हे काम करत असताना त्यांना पतींचा हातभार मिळत असे.

मात्र त्यांना आपल्या घरकामामुळे व शेतीच्या कामामुळे पाहिजे तेवढे लक्ष समाजकार्यात घालता येत नसे. यामुळे त्यांना कांही जनरल मिटींगना हजर राहता येत नसे. त्यांना या कामासाठी नवडून आल्यानंतर मात्र कुटुंबाकडून कोणत्याही प्रकारचा विरोध राहीला नाही.

सभेच्यावेळी घेतलेले निर्णय व त्याची अंमलबजावणीबाबत व नगर-पालिकेची प्रशासन व्यवस्था ढीली असल्याबद्दल खंत व्यक्त केली. मात्र नगरपालिकेची आरोग्य समिती व्यवस्थित काम करते यावर त्यांचे कांहीही मत नव्हते.

आपल्या प्रभागातील स्वच्छता राखणे, कोंडाळे ठेवणे, लाईटची सोय करणे यावर त्या भर देत आहेत.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, प्रभाग क्रमांक ९ मधील स्त्री-प्रतिनिधीच्या निवडून येण्यापाठीमागे आर्थिक, सामाजिक व राजकीय घटकांचा प्रभाव पडलेला आहे. परंतु पुरुष प्रधान संस्कृतिमुळे व कौटुंबीक जबाबदारीमुळे नगरपालिकेत स्त्री प्रतिनिधी म्हणून निवडून येऊन सुध्दा पाहिजे त्या प्रमाणात त्यांच्याकडून कार्य होऊ शकत नाही असे दिसून येते.

४) सौ. गौराबाई बजरंग सोनुले - प्रभाग क्र. ११
— मागासवर्गीय स्त्री प्रतिनिधी

वय - २८ वर्षे. शिक्षण - ५वी पास.

वडीलाकडील आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची तसेच पती नोकरी करत असलेने इकडील परिस्थिती तशी बऱ्यापैकी आहे.

सामाजिक परिस्थिती :

वडील समाज कार्यात रस घेत असत. समाजातील भांडण-तंटे सोडवण्यासाठी लोक वडीलांकडे येत असत. पतीसुध्दा समाजात एकत्रितपणे वावरल्याने त्यांची प्रतिष्ठा होती.

राजकीय परिस्थिती :

वडील राजकीय वातावरणात कधीच नव्हते. मतदान करण्यापलिकडे त्यांचा राजकारणाशी फारसा संबंध नव्हता. परंतु पती राजकारणात रस घेणारे असलेने त्यांच्या प्रोत्साहनामुळे राजकारणातील धडे मिळाले.

१९९० च्या नगरपालिकेच्या निवडणूकीत पतीच्या सांगण्यावरून उमेदवारी भरली. निवडणूकीतील विजयानंतर पतीच्या प्रोत्साहनामुळे राज-कारणात ख-या अर्थाने प्रवेश झाला. त्या इयत्ता ५वी पास असल्याने व फारसा लिहिता-वाचता येत नसल्याने कधीतरीच त्या सर्वसाधारण सभेला हजर राहात असत. ब-याचवेळा त्यांचे पती सभेला हजर असत. त्यांच्या प्रभाग क्र.११ मध्ये समाजमंदिर, डॉ. आंबेडकर स्मारक, चांभारगल्ली डांबरीकरण करणे, डोंबारगल्ली डांबरीकरण अशा सुधारणा झालेल्या आहेत. परंतु या प्रभागात सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी सुविधा नाहीत. याची वेळोवेळी सर्वसाधारण सभेमध्ये मागणी करूनही नगरपालिकेचे दूर्लक्ष होते अशी खंत त्या सांगतात.

निवडून आल्यानंतर आरोग्य समिती सदस्या म्हणून, महिला व बालकल्याण समिती सदस्या म्हणून, मागासवर्गीय कल्याण समिती सदस्या म्हणून काम केले आहे.

मागासवर्गीय कल्याण समितीमध्ये काम करत असताना विशेषत: आपला समाज हा इतर समाजाच्या मानाने मागे न राहता महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज यांच्या विचारांचा वसा घेऊन त्यांनी पुढे यावे यासाठी विविध व्याख्यानांचे नियोजन करण्यात पुढाकार त्यांनी घेतला होता.

तसेच त्यांच्या या कामात त्यांना पती अथवा त्यांच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीचा विरोध नाही.

मागासवर्गीय समाजासाठी वेगळी बालवाडी असणे, बालमंदीर तसेच स्त्रियांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी त्या सतत प्रयत्नशील असतात.

वरील विवेचनावरून असे दिसते की, प्रभाग क्र. ११ मधून निवडून आलेली स्त्री-प्रतिनिधी यांच्यावर सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक या घटकांचा प्रभाव पडलेला नव्हता तर प्रभाग क्र. ११ मधील मागासवर्गीय स्त्री-राखीव असलेने तसेच पती कांही प्रमाणात राजकारणात असल्याने त्यांना देण्यात आली होती. निवडून आल्यानंतर मात्र पतीच्या प्रोत्साहनामुळे त्या नगर-पालिकेत स्त्री प्रतिनिधी म्हणून काम करत असत.

५)  सौ. सोनाबाई विष्णुपंत जाधव - प्रभाग क्र. १२

वय - ४७ वर्षे.  शिक्षण - जुनी ३री पर्यंत

आर्थिक परिस्थिती :

वडील शिवणकाम तर भाऊ नोकरी करत असलेने व थोडीफार शेतीवाडी असलेने परिस्थिती चांगली होती. तसेच पती व्यावसायिक असलेने व मुले व्यापार व नोकरीत असलेने पतीकडील आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली आहे.

सामाजिक परिस्थिती :

वडीलाकडील मंडळी व पतीसुध्दा सामाजिक कामात पुढाकार घेत असत. पती परीट समाजाचे अध्यक्ष असल्याने या समाजातील समस्यांची चर्चा घरामध्ये होत असे. त्यामुळे अशा समस्यांची माहिती त्यांना मिळाली. तसेच पती स्थानिक सहकारी बँकेचे संचालक असलेने त्यांचा समाजातील विविध घटकांशी संबंध आला त्यामुळे पती सामाजिक कामात पुढे आले. त्यामुळे सौ. सोनाबाईंनासुध्दा समाजात स्थान मिळाले.

राजकीय परिस्थिती :

वडील ग्रामपंचायत सदस्य व पती सामाजिक कार्यात सक्रीय असल्याने त्यांना वडीलांकडूनच राजकीय वारसा मिळाला. त्याला पतीची जोड मिळाली. तसेच पतीने नगरपालिकेच्या निवडणूकीत स्त्री-उमेदवार म्हणून, प्रोत्साहन दिले होते.

स्त्री-प्रतिनिधी म्हणून प्रभाग क्र.१२ मधून त्या निवडून आल्यानंतर त्यांचे शिक्षण ३ री पर्यंत झालेने व स्त्रीयांची शिक्षणाची दुर्दशा त्यांना माहिती असल्याने त्यांनी स्त्री शिक्षणासाठी उपाय योजना व्हाव्यात यासाठी प्रयत्न चालवले होते.

घरी सर्व सुशिक्षित असलेने व सामाजिक व मोकडे वातावरण असलेने त्यांना आपल्या कामात व्यत्यय आला नाही. मात्र घरच्या कामामुळे प्रत्येक वेळेच्या सर्वसाधारण सभांना त्यांना उपस्थित राहता येत नव्हते.

१९९०-९१ मध्ये - जकाम समिती सदस्य

१९९१-९२ मध्ये - बांधकाम समिती सदस्य

१९९२-९३ मध्ये - महिला व बालकल्याण समिती सदस्य

१९९३-९४ मध्ये - महिला व बालकल्याण समिती सदस्य

म्हणून काम करत आहेत.

मात्र महिला व बालकल्याण समिती सोडून इतर समित्यांमध्ये पाहिजे तेवढा सहभाग घेता येत नसे.

आपल्या प्रभागासाठी व लोकांच्या हिताचे प्रश्न त्या जनरल मिटींगला मांडत असत. भैगी पॅसेज, बांधणे, पक्की गटार योजना पूर्ण करणे यावर त्यांचा भर राहिला.

३० टक्के महिला राखीवतेमुळे नगरपालिका कामकाजात व महिला धोरणात सुधारणा झाल्या. परंतु शहर स्वच्छतेबाबत कार्यालयात वेळो-वेळी तक्रारी दिल्या.

सरकारी दवाखान्यात कॉटेजची मागणी करण्यात पुढाकार घेतला. मात्र सभेमधील निर्णयांची अंमलबजावणी नसल्याने नाराजी व्यक्त केली.

वरील विवेचनावरून आपणास असे दिसून येते की, पतीच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा मोठा प्रभाव या स्त्री-प्रतिनिधीना निवडणूकीत झालेला होता. तसेच पती राजकीय कार्यातसुध्दा सहभागी रहात असलेने त्यांच्या प्रतिष्ठेवरच त्यांना उमेदवारी व नगरपालिकेत प्रतिनिधीत्व मिळाले. पुरूषप्रधान संस्कृतीमुळे मात्र त्यांना सर्वसाधारण सभांना जाता येत नसे असे यावरून दिसून येते.

६) सौ. आनंदी रामचंद्र भारमल - प्रभाग क्र. १८

वय - ५० वर्षे. शिक्षण - ७वी पास.

आर्थिक परिस्थिती :

वडील शेतकरी असलेने वडीलाकडील आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली. तसेच पतीकडीलसुध्दा व्यवसाय हा शेतीचाच असल्याने तेथेही परिस्थिती अत्यंत चांगली आहे.

सामाजिक परिस्थिती :

पतीकडे सामाजिक बांधीलकी असलेने व ते लोकांची विचारपूस करत असलेने तसेच सामाजिक कार्यात पुढाकार घेत असलेने त्यांना समाजात स्थान होते. सौ. आनंदी सुध्दा स्त्रियांच्यात मिळून मिसळून वागतात.

राजकीय परिस्थिती :

वडीलाकडील वातावरण राजकीय नव्हते. परंतु पतीकडील वातावरण मात्र पूर्णपणे राजकीय आहे. त्यांचे दीर ३० वर्षे राजकारणात होते ते मुरगूड नगरपालिकेचे १० वर्षे उपनगराध्यक्ष म्हणून काम पहात होते. समाजात त्यांची प्रतिष्ठा होती.

त्यांच्या कौटुंबिक राजकीय परिस्थितीमुळे त्यांना १९९० च्या नगर-पालिकेच्या निवडणूकीमध्ये उमेदवारी मिळाली. निवडून आल्यानंतर त्यांचे शिक्षण ७वी पास असल्याने व इतके कमी शिक्षण झाले असल्याने स्त्रियांना सुशिक्षित बनले पाहिजे त्याशिवाय त्या स्वत:च्या पायावर उभा राहू शकणार नाहीत या हेतूने तसेच याच काळात शासनातर्फे प्रौढ साक्षरता वर्ग भरवत असलेने त्यांनी स्त्रियांना प्रौढ साक्षरता वर्गात घालण्याची धडपड सुरू केली होती.

त्यांनी आरोग्य समितीच्या सदस्या म्हणून एक वर्ष काम केले. त्यामध्ये शहरासाठी स्वच्छ पाणी पुरवठा व सांडपाणी निचरा होण्यासाठी योग्य उपाय योजना करण्यासंबंधी धडपड सुरू केली होती.

या नंतरच्या काळात गाव तलावातील केंजळ काढून तेथे धोबी कट्टा बांधण्याविषयी जनरल मिटींगवेळी सुचना केल्या होत्या.

पुढील वर्षामध्ये त्या वनीकरण समितीच्या सदस्या झाल्या. यामध्ये काम करत असताना त्यांनी नगरपालिका हद्दीत वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवला. परंतु त्यांना योग्यवेळी पाणी व त्याची देखभाल न झाल्याने हा उपक्रम तसाच राहून गेल्याची खंत त्यांनी व्यक्त केली होती.

जनरल मिटींगला त्या सतत हजर रहात असत. आपल्या प्रभागामध्ये सार्वजनिक संडासची सोय नसल्याबद्दल मात्र त्यांनी खंत व्यक्त केली होती.

वरील विवेचनावरून आपणास असे दिसून येते की, प्रभाग क्र. १८ मधील स्त्री प्रतिनिधीच्या राजकीय कार्यावर व प्रतिनिधीत्व मिळण्यापाठीमागे त्यांच्या कुटुंबाचा राजकीय सहभागाचा मोठा प्रभाव पडलेला होता. त्यांच्या कुटुंबाला राजकारणाचा वारसा मिळाल्यामुळे स्त्री उमेदवारी मिळण्यासाठी त्यांना फारसे प्रयत्न करावे लागले नसोवेत असे वाटते.

७) सौ. सुनंदा नामदेव मैंडके - प्रभाग नं. २२

शिक्षण - ७ वी.

आर्थिक परिस्थिती :

वडीलाकडील परिस्थिती अत्यंत चांगली. कारण वडील शेती करत होते. तर भाऊ नोकरी करत होते. पतीसुध्दा नोकरी व शेती करतात त्यामुळे पतीकडील आर्थिक परिस्थितीही चांगली आहे.

सामाजिक परिस्थिती :

वडील व पतीसुध्दा सामाजिक कार्यात सहभागी असलेने त्यांना समाजात प्रतिष्ठा होती. त्यामुळेच या सुध्दा समाजाला परिचित झाल्या आहेत.

राजकीय परिस्थिती :

राजकारणाचे धडे त्यांना त्यांच्या वडिलांकडूनच मिळाले. कारण वडील स्थानिक दूध विकास संस्थेचे १० वर्षे चेअरमन म्हणून काम पहात होते. तसेच ते ग्रामपंचायत सदस्यही होते. त्यामुळे वडिलांकडील वातावरण हे तसे राजकीयच होते. ग्रामपंचायत निवडणूकीवेळी वडिलांच्या प्रचाराला जाणे हळदी-कुंकू कार्यक्रम घेणे अशी कामे त्या करत असत.

परंतु पतीकडे आल्यानंतर समाजामध्ये पाहिजे तेवढी मिसळण्याची संधी मिळाली नाही. पतीसुध्दा राजकारणी होते. १९९० च्या निवडणुकीत स्त्री उमेदवार यांना उभे करण्याचा हा विचार त्यांच्या पतींचा होता. त्यांचे तसे प्रोत्साहन मिळाल्याने त्यांनी उमेदवारी स्वीकारली.

या नगरपालिका निवडणूकीत निवडून आल्यानंतर पहिल्या वर्षी त्या आरोग्य समितीच्या सदस्या झाल्या. या समितीत काम करत असताना विशेषत: शहर स्वच्छतेविषयी उपाय योजना करण्याकडे त्यांनी भर दिला. तसेच पावसाळी मोसमात जनावरांना रोग होऊ नये म्हणून लस टोचणीची मोहिम हाती घेण्यासाठी नगरपालिकेमध्ये सतत प्रयत्न केले.

तसेच त्या महिला व बालकल्याण समितीच्याही सदस्य राहिल्या. या समितीत काम करत असताना महिलांच्या विविध सामाजिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालवले. त्यांच्या पुढील काळात त्या पाणी पुरवठा समितीच्या सदस्या राहिल्या. शहरासाठी पाणी पुरवठा व्यवस्थित व स्वच्छ कसा राहील याकडे लक्ष देण्यात आले होते.

जनरल सभेच्यावेळी सतत हजर राहून कर्मचाऱ्यांना काम नेमून देण्याविषयी सुचना देणे, पाणी पट्टी वाढ झाल्याबद्दल तक्रारी, घरफाळा दुप्पट वाढीबद्दल तक्रारी करुन त्यासाठी योग्य ती अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्नशिल होत्या.

विशेषत: मुलांसाठी पाळणाघरे, बालवाडी अशा प्रकारच्या योजना कार्यान्वित करुन एक मुरगूड नगरपालिका एक आदर्श नगरपालिका असावी असा मानस त्यांनी व्यक्त केला. आहे.

प्रभाग क्रमांक २२ मधील स्त्री उमेदवार निवडून येण्यापाठीमागे त्यांच्या वडिलाकडील राजकीय वारसा, प्रभाव पाडत असलेला दिसून येतो. कारणवडील राजकीय कार्यात असलेने त्यांना त्या कार्याची ओळख झालेली होती. तसेच पतीसुध्दा राजकारणी असलेने राजकीय कार्यात येण्याची सौ. मेंडके यांना सहजच संधी मिळाली. राजकीय कार्यात आवड निर्माण झाल्याने त्या सतत नगरपालिकेच्या कामकाजात लक्ष घालत असत हे यावरुन दिसून येते.

८) सौ. शकुंतला बाजीराव गोधडे - प्रभाग क्र. २४

वय - ३५ वर्षे. शिक्षण - ४थी

आर्थिक परिस्थिती :

वडील शेती व भाऊ नोकरी करीत असल्याने घरची आर्थिक परिस्थिती चांगली तसेच पतीकडील स्थीती सुध्दा चांगली आहे.

सामाजिक परिस्थिती :

वडील व पती दोघे ही समाजात जाऊन त्यांच्याशी मिळून मिसळून वागणारे तसेच समाजाची बांधीलकी असणारे असलेने त्यांना सामाजिक प्रतिष्ठा लाभलेली होती. समाजाचे कोणतेही काम पती पुढे येऊन करत असत.

राजकीय परिस्थिती :

आजोबा ग्रामपंचायत सरपंच, विविध सेवा संस्था व आर्थिक संस्थांचे पदाधिकारी म्हणून काम करत असलेने राजकारणाचा वारसा आजोबाकडूनच त्यांना मिळाला. सासरे - स्वातंत्र्य सैनिक व पती समाजकार्यात पुढे असलेने त्यांना राजकारणात संधी मिळाली.

विधानसभा निवडणूकांवेळी प्रचार सभा घेणे, प्रचार फेरी काढणे, हळदी-कुंकू समारंभ घेणे अशी कामे त्या करत असत. त्यामुळे त्यांना समाजात स्थान होते.

नगरपालिकेत स्त्री उमेदवार म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी विविध समित्यांवर काम केले. त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम समिती, पाणीपुरवठा समिती, मागासवर्गीय कल्याण समिती, महिला व बालकल्याण समिती या समीत्यांचा समावेश आहे. सध्या त्या जकात समिती चेअरमन म्हणून आणि स्थायी समिती सदस्य म्हणून काम पहात आहेत.

मुलांच्या आरोग्याविषयी शिबीरे घेणे, सुदृढ बालक स्पर्धा आयोजित करणे, दलितांना त्यांचा सामाजिक बांधीलकीची जाणीव करून देणे. त्यांच्या मुलांसाठी खाऊ वाटप करणे अशी कामे त्या करत असत.

डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज यांचे विचार समाजात रुजावेत यासाठी वेळोवेळी नगरपालिका सभागृहात कार्यक्रम घडवून आणण्यासाठी त्यांचा पुढाकार आहे. शहरातील पाणी टंचाई दूर होण्याच्या दृष्टीने पाणी समिती सदस्य म्हणून प्रयत्न केले होते.

मात्र सतत त्या जनरल मिटींगच्यावेळी हजर राहत असत . त्यांना त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींचा विरोध नसे. आपल्या प्रभागासाठी कोंडावळे, बसवणे, रस्ते डांबरीकरण करणे, सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी उपाय योजना करणे अशा कामावर भर दिला जातो.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, वडिलांकडील विशेषत: आजोबाकडील राजकीय वातावरणामुळे या स्त्री प्रतिनिधींना राजकीय व सामाजिक कार्याची जाणीव व आवड निर्माण झाली होती. त्यातच पतीकडील राजकीय वातावरण सुध्दा चांगले असलेने त्यांना राजकीय कार्य करण्याची संधी नगरपालिकेच्या माध्यमातून प्राप्त झाली.

वडिलांचे अनुभव व पतीचे प्रोत्साहन यामुळेच त्या राजकीय कार्यात सहभागी होऊन त्या योग्य प्रकारे कार्यवाही करु शकल्या असे दिसून येते.

वरील सर्व माहिती लक्षात घेतल्यानंतर आपणास असे दिसून येते की,

सन १९९० मध्ये निवडून आलेल्या ८ ही स्त्रियांच्या निवडणूकीवर व कार्यावर राजकीय घटकांचा फार मोठा प्रभाव पडलेला जाणवतो. याचे एक प्रमुख कारण म्हणजे सर्व स्त्री प्रतिनिधींच्या कुटुंबाचे वातावरण हे राजकीय आहे, हे होय. त्यांच्या कुटुंबाच्या राजकीय हालचालींचा व

कार्यात सहभागी असण्याचा, निवडून येण्यापाठीमागे सहाय्यक ठरला. म्हणजेच ज्यांना स्त्री उमेदवारी मिळाली त्यापैकी कांही स्त्रियांचे पती राजकारणात सक्रियपणे भाग घेणारे आढळून येतात. तर कांही स्त्री उमेदवारांच्या कुटुंबातील सदस्य राजकीय कार्य करीत असलेले दिसून येतात.

यावरून असे स्पष्ट होते की, बहुतांशी स्त्रीया या त्यांच्या कुटुं-बातील राजकीय वातावरणामुळे राजकीय प्रक्रियेत सहभागी होतात व त्यांना प्रतिनिधीत्व मिळाल्यानंतर राजकीय कार्याची आवड असणाऱ्या स्त्रियाच या क्षेत्रात टिकून राहातात.

याशिवाय नगरपालिकेतील या आठ स्त्री सदस्या पैकी ५ स्त्री सदस्यां-वर सामाजिक घटकाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. कारण या ५ स्त्री सदस्यांच्या कुटुंबातील वातावरण हे राजकीय घटकाच्या जोडीला सामाजिक घटकावर आधारीत आहे. या ५ स्त्री कुटुंबापैकी ३ स्त्री कुटुंबे ही सामाजिक कार्यात सतत सहभागी होत असणारी आहेत. तसेच ही कुटुंबे सामाजिक मुल्ये जोपासणारी आहोत. तर राहिलेली २ स्त्री सदस्यांची कुटुंबे ही औचित्यापुरती, मर्यादित स्वरूपाची सामाजिक कामे करत असतात. त्यामुळे वरील ५ स्त्री सदस्यांच्या निवडणूकीवेळी व काम करत असताना त्यांच्यावर सामाजिक घटकाचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

राजकीय व सामाजिक घटकाबरोबर निवडून आलेल्या ८ स्त्री प्रति-निधीपैकी ४ स्त्री प्रतिनिधींच्या कार्यावर व निवडून येण्यापाठीमागे कुटुंबाच्या आर्थिक घटकाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. या ४ स्त्री प्रतिनिधीं-च्या उमेदवारीचा निश्चिती होत असताना त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक

परिस्थितीचा विचार करण्यात आला होता. तसेच या आर्थिक घटकाद्वारे या कुटुंबातील लोक हे जन-सामान्यांना जवळ करत असल्याने त्यांच्या कुटुंबांचा समाजात प्रभाव होता. त्यामुळेच त्यांना उमेदवारी देण्यात आली असे आपणास म्हणावे लागेल.

वरील तीन्ही घटकाशिवाय शिक्षण या घटकावर दृष्टीक्षेप टाकल्यास आपल्या निदर्शनास असे येते की, या सर्वच्या सर्व स्त्री प्रतिनिधींनी १० वी पेक्षा जास्त शिक्षण घेतलेले नाही. त्यामुळे त्यांना नगरपालिकेच्या कामकाजाची म्हणावी तितकी जाण असावी असे वाटत नाही. परंतु एवढे कमी शिक्षण असून सुध्दा कुटुंबातील इतर सदस्य सुशिक्षित असल्याने त्यांना ते मदत करत असतात व त्यांच्याद्वारे त्या आपला कारभार व्यवस्थित चालवू शकतात. म्हणजेच शिक्षणाचा फार मोठा परिणाम त्यांच्या राजकीय वर्तनावर होतो असे कांही नसून कमी शिक्षण घेतलेल्या स्त्रिया सुध्दा चांगले राजकीय कार्य करु शकतात असे आपणास दिसून येते.

वरील सर्व बाबी लक्षात घेतल्यास आपणास असे दिसून येते की, ज्या स्त्रियांच्या कार्यात राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रभाव आहे अशाच स्त्रीया या नगरपालिकेतील कारभार सुरळीतपणे चालवू शकतात. हा कारभार सुरळीत चालवण्यासाठी नगरपालिकेकडून खालील प्रकारच्या समित्यांची सभा कामकाज नियमावलीनुसार स्थापना केली आहे. [५] या समित्या खालील-प्रमाणे निवडल्या जातात.

८) महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांची निवड व सभापतींची निवड महिला सदस्यांतून केली जाते.

१) स्थायी समिती
२) आरोग्य समिती
३) सार्वजनिक बांधकाम समिती
४) पाणी पुरवठा समिती
५) नियोजन विकास व शिक्षण समिती
६) मागावर्गीय कल्याण समिती
७) महिला व बालकल्याण समिती
८) जकात समिती

या समित्यांपैकी सन १९९१ ते ९५ मध्ये कोणाकोणत्या समितीवर कोणाकोणत्या पदावर स्त्री प्रतिनिधी काम करत होत्या ते पाहू.

<u>सन १९९१-९२ :</u>

| समितीचे नांव | स्त्री सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) आरोग्य समिती | १) सौ. सुनंदा नामदेव मेडके | सदस्य |
| | २) सौ. गौराबाई बजरंग सोनुले | सदस्य |
| २) पाणीपुरवठा समिती | १) सौ. शकुंतला बाजीराव गोधडे | सदस्य |
| ३) नियोजन, विकास व शिक्षण समिती | १) सौ. वंदना रघुनाथ चौगुले | सदस्य |
| | २) सौ. उमादेवी रघुनाथ सुर्यवंशी | सदस्य |
| ४) जकात समिती | १) सौ. सरस्वती गजानन भाट | सदस्य |
| | २) सौ. सोनाबाई विष्णुपंत जाधव | सदस्य |

| | समितीचे नांव | स्त्री सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|---|
| ५) | मागासवर्गीय कल्याण समिती. | १) सौ. गौराबाई बजरंग सोनुले | सदस्य |
| ६) | महिला व बालकल्याण समिती | १) सौ. शकुंतला बाजीराव गोधडे | चेअरमन |
| | | २) सौ. सुनंदा नामदेव मेंडके | सदस्य |
| | | ३) सौ. सरस्वती गजानन भाट | सदस्य |
| | | ४) सौ. उमादेवी रघुनाथ सुर्यवंशी | सदस्य |
| | | ५) सौ.गौराबाई बजरंग सोनुले | सदस्य |

स्थायी समिती व सार्वजनिक बांधकाम समिती यावर एकही स्त्री-सदस्य नियुक्त केली गेली नाही. [६]

सन १९९२-९३ :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आरोग्य समिती | १) सौ.आनंदी रघुनाथ भारमल | सदस्य |
| २) | सार्वजनिक बांधकाम समिती | १) सौ.वंदना रघुनाथ चौगुले | सदस्य |
| | | २) सौ.सोनाबाई विष्णुपंत जाधव | सदस्य |
| ३) | पाणी पुरवठा समिती | १) सौ. सुनंदा नामदेव मेंडके | सदस्य |
| ४) | नियोजन, विकास व समिती | १) सौ.वंदना रघुनाथ चौगुले | सदस्य |
| | | २) सौ.उमादेवी रघुनाथ सुर्यवंशी | सदस्य |
| ५) | जकात समिती | १) सौ.सरस्वती गजानन भाट | सदस्य |

| | समितीचे नांव | स्त्री सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|---|
| ६) | मागासवर्गीय कल्याण समिती | १) सौ.गौराबाई बजरंग सोनुले | सदस्य |
| ७) | महिला व बालकल्याण समिती | | |
| | | १) सौ.सरस्वती गजानन भाट | चेअरमन |
| | | २) सौ.शकुंतला बाजीराव गोधडे | सदस्य |
| | | ३) सौ.सुनंदा नामदेव मेंडके | सदस्य |
| | | ४) सौ.आनंदी रघुनाथ भारमल | सदस्य |
| | | ५) सौ.गौराबाई बजरंग सोनुले | सदस्य |

वरील वर्गवारीवरून असे दिसते की सन १९९२-९३ मध्ये स्थायी समितीमध्ये स्त्रीला प्रतिनिधीत्व नव्हते. [७]

सन १९९३-९४ :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आरोग्य समिती | १) सौ.वंदना रघुनाथ चौगले | सदस्य |
| | | २) सौ.सोनाबाई विष्णुपंत जाधव | सदस्य |
| २) | सार्वजनिक बांधकाम समिती | १) सौ.शकुंतला बाजीराव गोधडे | सदस्य |
| ३) | नियोजन,विकास व शिक्षण समिती | १) सौ.उमादेवी रघुनाथ सुर्यवंशी | सदस्य |
| ४) | जकात समिती | १) सौ.सुनंदा नामदेव मेंडके | सदस्य |

वरील विवेचनावरून सन १९९३-९४ मध्ये स्थायी समिती व पाणी पुरवठा समितीवर स्त्री-सदस्य निवडले नव्हते असे आपणास दिसून येते. [८]

| समितीचे नांव | | स्त्री सदस्याचे नांव | पद |
| --- | --- | --- | --- |
| सन १९९४-९५ : | | | |
| १) | आरोग्य समिती | १) सौ. सोनाबाई विष्णुपंत जाधव | सदस्य |
| २) | पाणी पुरवठा समिती | १) सौ. सुनंदा नामदेव मेंडके | चेअरमन |
| ३) | नियोजन, विकास व शिक्षण समिती | १) सौ. उमादेवी रघुनाथ सुर्यवंशी | सदस्य |
| ४) | सार्वजनिक बांधकाम समिती | १) सौ. वंदना रघुनाथ चौगुले | चेअरमन |
| ५) | जकात समिती | १) सौ. शकुंतला बाजीराव गोधडे | चेअरमन |
| ६) | मागासवर्गीय कल्याण समिती | १) सौ. गौराबाई बजरंग सोनुले | सदस्य |
| ७) | महिला व बाल कल्याण समिती | १) सौ. सरस्वती गजानन भाट | चेअरमन |
| | | २) सौ. गौराबाई बजरंग सोनुले | सदस्य |
| | | ३) सौ. आनंदी रघुनाथ भारमल | सदस्य |
| | | ४) सौ. सोनाबाई विष्णुपंत जाधव | सदस्य |
| | | ५) सौ. उमादेवी रघुनाथ सुर्यवंशी | सदस्य |
| ८) | स्थायी समिती | १) सौ. वंदना रघुनाथ चौगुले | सदस्य |
| | | २) सौ. शकुंतला बाजीराव गोधडे | सदस्य |
| | | ३) सौ. सुनंदा नामदेव मेंडके | सदस्य |

वरील बाबीवरुन असे दिसते की सन १९९४-९५ मध्ये स्त्री सदस्यांना सर्व समित्यांमध्ये स्थान मिळाले आहे. [९]

वरील सन १९९१ ते १९९३ पर्यंतच्या सर्व समित्यांचा अभ्यास केल्यास आपणास असे दिसून येते की, आरोग्य समिती, पाणीपुरवठा समिती, महिला व बालकल्याण समिती या पारंपरिक समित्यांवर सदस्य म्हणून निवड झाली आहे. तर सन १९९३-९४ च्या काळात वरील समित्याबरोबर नियोजन, विकास व शिक्षण समिती, जकात समिती, सार्वजनिक बांधकाम समिती या समित्यांवर निवड झाली आहे. सन १९९४-९५ मध्ये स्त्री प्रतिनिधींना पाणी पुरवठा समिती, सार्वजनिक बांधकाम समिती, जकात समिती, महिला व बालकल्याण समिती या समित्यांचे सभापती पद मिळाले आहे. या समित्यांमध्ये त्या सतत सहभागी असतात. त्यामुळे त्यांचा नगरपालिकेच्या कार्यावर व प्रशासनावर प्रभाव पडलेला आहे. अशी सार्वजनिक कामे करत असताना सन १९९२ पूर्वी त्यात राजकीय अडथळे येत असत. कारण त्या काळात दोन स्थानिक राजकीय गट नगरपालिकेच्या राजकारणात होते. परंतु १९९२ नंतर हे दोन्ही गट एकत्र आल्याने कोणत्याही कामात सध्या अडथळे येत नाहीत. विविध समित्यांवर काम करत असलेल्या स्त्रियांना त्या समित्यांचे वार्षिक आर्थिक नियोजन माहिती आहे. मात्र स्त्री प्रश्नांची माहिती असून त्या सोडवणूकीसाठी आणखी कांही वर्षे लागतील असा त्यांचा विचार आहे.

यापूढील निवडणूक लढवण्यासाठी आपण पतीवर अवलंबून आहे असे त्यातील चार स्त्री सदस्या म्हणाल्या. तर चार सदस्या आपण स्वत: निवडणुक लढविण्यास तयार असल्याचे सांगितले.

स्त्री प्रतिनिधींच्या कामकाजाबाबत नगरपालिका नागरिकांना विचारले असता त्यांनी स्त्रियांच्या राजकीय कारभारावर विश्वास दाखविला. त्यांच्या कामाबद्दल व नियोजनाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

या सर्व घटकांचे निरिक्षण केल्यानंतर आपणास असे आढळून येते की, महिलांच्या तीस टक्के राखीव जागा केल्यामुळे खालील बदल घडून आले आहेत.

(१) महिलांना नगरपालिकेच्या कारभारात काम करण्याची संधी मिळाली.

(२) महिलांच्या सदस्य संख्येत वाढ झाली.

(३) उच्च वर्गीय, उच्च वर्णीय यांच्या बरोबरच मध्यमवर्गा, मागास व इतर मागास वर्गीय महिलांना राजकीय कारभारात सहभाग मिळाल्याने त्यांच्यामध्ये गुणात्मक लक्षणीय बदल घडून आला.

(४) महिला या जनरल सभेला हजर राहिल्यामुळे नगरपालिका सदस्यांच्या गैरवर्तनाला आळा बसला.

(५) जनरल सभेत महिलांच्या उपस्थितीमुळे सदस्यांच्या वर्तनात्मक व वैकल्पिक बदल घडून आला.

(६) विविध समित्यांवर मंजूर करण्यात आलेला पैसा खऱ्या अर्थाने त्यांच्यावरच व तेवढाच खर्च होतो की नाही याकडे लक्ष राहू लागले.

(७) महत्त्वाची सुधारित कामे अंगीकारली जावू लागली.

(८) मंजूर करण्यात आलेली सर्व कामे कोणतीही टाळाटाळ न करता वेळच्या वेळी पूर्ण होऊ लागली.

(९) भ्रष्टाचारासारख्या घटणांना आळा बसला.

(१०) हुषार आणि दक्ष नगरसेविकांच्याकडून लोक सुधारित कामे करून घेवू लागले.

(११) विश्वास व कर्तव्यदक्षता यामुळे त्या समाजाच्या विश्वासास पात्र ठरल्या.

(१२) या सर्वच आधारामुळे महिला नगरपालिकेच्या राजकीय कारभारात आपले स्थान वाढवत आहेत.

(१३) स्त्रीयांचे प्रश्न सोडवणाऱ्या समित्यावर महिला उमेदवारांचे लक्ष राहिल्यामुळे बरेच प्रश्न मार्गी लागले.

या सर्व निष्कर्षावरुन असे दिसून येते की, महिला नगरसेविकांचे राजकीय प्रक्रियेत सहभाग वाढून महिला नगरसेविकांच्या राजकीय कार्यक्षमतेत गुणात्मक वाढ झाली आहे.

.......

## प्रकरण तिसरे

## संदर्भसूचि

१) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ चे कलम ९(२) अन्वये.

२) रिपोर्ट कमिटी ऑन व्युमन स्टेटस् इन इंडिया, १९७१-७४.

३) महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९० (सन १९९० चा क्रमांक १३ चा अधिनियम) मधील कलम ६ अन्वये.

४) महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका निवडणुक अधिनियम परिपत्रक क्र.एम्.आय.एस्. १०९०/सीआर ७४/९०/नवि २०, दि. ३० जून, १९९० नुसार.

५) मुरगूड नगरपालिकेच्या सन १९९१-९२ च्या कामकाज अहवालानुसार, पान नं. १२.

६) मुरगूड नगरपालिकेच्या सन १९९१-९२ च्या कामकाज अहवालानुसार, पान नं. १३.

७) मुरगूड नगरपालिकेच्या सन १९९२-९३ च्या कामकाज अहवालानुसार, पान नं. १७.

८) मुरगूड नगरपालिकेच्या सन १९९३-९४ च्या कामकाज अहवालानुसार, पान नं. १४.

९) मुरगूड नगरपालिकेच्या सन १९९४-९५ च्या कामकाज अहवालानुसार, पान नं. २०.

१०) कोल्हापूर महानगरपालिकेतील स्त्रियांचा राजकीय सहभाग
अप्रकाशित यु.जी.सी. प्रोजेक्ट, डॉ. वासंती रासम.

११) मुरगूड नगरपालिका सभा कामकाज नियमावली.

.......